# सापळा केस

दिनांक०१/०३/२०२१

**आलोसेकं ०१. सुधाकर दगडुजी जाधव वय ४५वर्षे व्यवसाय नौकरी सहायक अभियंता महावितरण शाखा कार्यालय जिंतुर ग्रामीण–२ बोरी (वर्ग २) व आलोसे कं.२ बालासाहेब विनायक बुधवंत, वय ३१ वर्षे, व्यवसाय कंत्राटी बाहयस्त्रोत तंत्रज्ञ, महावितरण शाखा कार्यालय जिंतुर ग्रामीण–१ चारठाणा रा.आनंद नगर,जिंतुर यांनी १,०००/– रू लाच स्विकारलेची यशस्वी सापळा कारवाई**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कार्यालय परभणी येथे दि.१८/०२/२०२१रोजी तक्रार दिली की, त्यांनी आसेगाव व दुधनगाव येथील २ शेतक–याचे शेतात शक्ती कंपनीतर्फे सोलरपंप बसविण्याचे कामपुर्ण झाल्याने त्याबाबतचे फोटो, आसीआर फॉर्म पुर्ण भरून संचिका तयार करून गावचे लाईनमन यांची स्वाक्षरी घेतली आहे. सदर संचीकेवर महावितरणचे इंजिनियर यांची मंजुरीसाठी अंतिम स्वाक्षरी घ्यावी लागते त्यानंतर सदरचे बिल मंजुर होवुन मिळते. करीता सदर दोन संचीकावर स्वाक्षरी घेण्यासाठी महावितरण बोरी उप विभागाचे इंजीनियर जाधव यांचेकडे गेलो असता त्यांनी तक्रारदार यांना प्रत्येक संचिकेवर स्वाक्षरी करण्यासाठी ५००/– रू याप्रमाणे दोन संचीकेसाठी १०००/– रू लाचेची मागणी करीत आहेत. तरी त्यांच्या विरूध्द कारवाई करावी वगैरे मकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत नमुद आलोसे कं ०१ व ०२ यांनी दिनांक १८.०२.२०२१ रोजी तक्रारदार यांचे आयसीआर फॉर्म सही करून बिल मिळवुन देण्यासाठी प्रति आयसीआर ५००/– रूपये १०००/– रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर दि.०१.०३.२०२१ रोजी सापळा कार्यवाही आजमाविण्यात आली असता महावितरण शाखा कार्यालय जिंतुर येथे आलोसे कं ०२ बुधवंत यांनी आलोसे कं ०१ जाधव यांचेकरीता तक्रारदार यांचेकडुन सदरलाचेची रक्कम १०००/– रूपये पंचासमक्ष स्विकारली आहे. आलोसे कं ०१ जाधव व आलोसे कं ०२ बुधवंत यांना ताब्यात घेतले असुन त्यांचे विरूध्द पो.स्टे. जिंतुर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. कल्पना बारवकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, पोना/कटारे, पोना/कुलकर्णी, पोशि/शेख मुक्तार, पोह/जहागीरदार, पोशि/चटटे, मपोशि/दंडवते, मपोशि/टेहरे, चापोह/चौधरी, चापोना/कदम अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बाबत अधिक माहीती साठी खालील दिलेल्या कमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी कमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री कमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक, ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड –८८८८८४१९६५
श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड– ९६६५४७९३३३
श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी – ७०२१००२११०
श्री.अमोल कडु पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी –८०८७०७२९१९

Scanned with CamScanner